# महाराष्ट्र शासन

## नागरीकांची सनद


### कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१

दुरध्वनीक्रमांक : ०२२-२२६२०२३१/३२

फॅक्स क्रमांक : ०२२-२२६२०२३२

# <u>नागरिक सनद</u>

प्रशासनामध्ये नागरिक हा अत्यंत महत्त्वाचा घटक असल्यामुळे नागरिकाला प्रशासनाबाबतची पारदर्शक माहिती उपब्लध होणे आवश्यक आहे ही माहिती एकत्रितरित्या उपलब्ध करुन मिळणे हा नागरिकाचा हक्क आहे व ती उपलब्ध करुन देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. नागरिकांना अत्यावश्यक माहिती उपलब्ध करुन त्याच्या माहिती मिळविण्याच्या हक्काची जाणीव त्यांना देणे म्हणजे नागरिक सनद होय. राज्यातील कला शिक्षणाची माहिती या नागरिकांच्या सनदेद्वारे उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने ही नागरिक सनद प्रसिध्द करण्यात येत आहे.

२. राज्यातील कला शिक्षणामध्ये कार्यरत असलेल्या संस्था त्यांचे मार्फत राबविण्यात येणारे अभ्यासक्रम, अभ्यासक्रम प्रवेशासाठी अर्हता व अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर उपलब्ध होणाऱ्या संधी यांचा परामर्श या सनदेत घेण्यात आला आहे. कला संचालनालय ही कला शिक्षणाच्या उन्नतीसाठी व कलाशिक्षणात सुसुत्रता आणण्यासाठी प्रस्थापित शासकीय यंत्रणा असून नागरिकांची कला शिक्षणाची गरज भागविण्याचे कार्य राबवते.

३. शिक्षणातील इतर प्रवाहांप्रमाणेच कला शिक्षण हा एक प्रवाह आहे. या शिक्षण प्रवाहाची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोचवून त्यासाठी उपलब्ध असलेल्या संधी व सोईसुविधा तसेच व्यवहारातील त्याची उपयुक्तता या महत्वाच्या गोष्टी जनतेसमोर ठेवणे आवश्यक असल्यामुळे कला शिक्षणाची माहिती या पुस्तिकेव्दारे नागरिकांची सनद या रुपाने प्रसिध्द करण्यात येत आहे. सर्वसामान्य जनतेमध्ये कलेची अभिरुची निर्माण करुन रसिक बनविणे हे कला शिक्षणाचे ध्येय आहे.

४. कला शिक्षणाच्या प्रसाराचे काम कला संचालनालयामार्फत महाराष्ट्रात करण्यात येत असून अखिल भारतीय स्तरावरमहाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे की, ज्या ठिकाणी कलेच्या शास्त्रोक्त प्रचारा/प्रसारासाठी स्वतंत्र कला संचालनालयाची स्थापना जून, १९६५ मध्ये महाराष्ट्र शासनाने केली आहे. या संचालनालयामार्फत माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांसाठी राज्य कला प्रदर्शन (विद्यार्थी विभाग) कला शिक्षणासाठी नवीन नवीन कला संस्था निर्माण करणे, त्यांना अनुदान मंजूर करणे, कला अभ्यासक्रमाची आखणी करणे व राबविणे, विद्यार्थ्यांची परीक्षा घेऊन त्यांना पदविका देणे तसेच व्यावसायिक कलाकारांसाठी राज्यकला प्रदर्शन भरविणे व राज्यातील कलांचे जतन व जपणूक करणे, कलाकारांना प्रोत्साहन देणे इत्यादी कला संचालनालयाची प्रमुख वैशिष्टे / कामे आहेत.

५. कला शिक्षण राबविण्यासाठी तसेच कला शिक्षणाबाबत मार्गदर्शन करण्यासाठी शासनाने राज्य कला मंडळ (आर्ट कौन्सिल) ची स्थापना केली आहे. त्या अंतर्गत १)परीक्षा समिती २) शैक्षणिक समिती व ३) सांस्कृतिक समिती येतात.

६. कला संचालनालयाचे मुख्य कार्यालय सर ज. जी. कला शाळा आवारात वसले असून त्यांच्या अखत्यारीत मुंबई मध्ये दोन, नागपूर व औरंगाबाद येथे प्रत्येकी एक शासकीय कला महाविद्यालय चालविले जाते त्या व्यतिरिक्त राज्यातील बहुतेक जिल्हयामध्ये कला शिक्षण संस्थांना शासनमान्यता देण्यात आली असून त्यामध्ये ३१ अनुदानित कला संस्था असून १७२ विनाअनुदानित कला संस्था आहेत व दरवर्षी समाजाची कला शिक्षणाची गरज लक्षात घेऊन नवीन कला संस्थाना विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्यात येते.

७. कला शिक्षणाचे अभ्यासक्रम पदवी आणि पदविका या दोन्ही स्तरावर उपलब्ध असून तो संबंधित विद्यापीठाशी संलग्न आहे याबाबतची माहिती सविस्तर खालीलप्रमाणे. .

कला संचालनालयाच्या अखत्यारीत शासकीय व शासनमान्य अशासकीय अनुदानित व विनअनुदानित कला संस्था येतात त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

**शासकीय कला संस्था**

१) सर ज. जी. कला महाविद्यालय, मुंबई येथे खालील पदवी व पदविका अभ्यासक्रम राबविले जातात.

**पदवी**

१. रंगकला व रेखाकला पदवी अभ्यासक्रम - ४ वर्ष
२. शिल्पकला व प्रतिमानबंध - ४ वर्ष
३. मातकाम - ४ वर्ष
४. अंतर्गत गृहसजावट - ४ वर्ष
५. वस्त्रकाम - पदवी
६. धातुकाम - ४ वर्ष
७. एम. एफ. अे. (रंगकला व रेखाकला) - २ वर्षे
   (बाय - पेपर) (बाय - रिसर्च)

**पदविका अभ्यासक्रम**

१. शिल्पकला व प्रतिमानबंध - ४ वर्ष
२. कला शिक्षक प्रशिक्षण - २ वर्ष
३. कला शिक्षणशास्त्र १ वर्ष
४. आर्ट मास्टर्स डिप्लोमा १ वर्ष

२) सर ज. जी. उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई येथे खालील पदवी अभ्यासक्रम व प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविले जातात.

१. बी. एफ. अे. पदवि अभ्यासक्रम ४ वर्ष मुदतीचा
२. एम. एफ. अे. (उपयोजित कला) २ वर्ष मुदतीचा
३. अंशकालीन (प्रमाणपत्र अभ्यासक्रम)
   I. फोटोग्राफी १ वर्ष कालावधी - (आठवड्यातून दोन वेळा)
   II. अंतर्गत गृहासजावट १ वर्ष कालावधी
       (आठवड्यातून दोन वेळा) (सोमवार ते शुक्रवार)

३) शासकीय चित्रकला महाविद्यालय, नागपूर

१. बी. एफ. अे. (उपयोजित कला) - ४ वर्ष मुदतीचा पदवी
२. बी. एफ. अे. (रंगकला व रेखाकला) - ४ वर्ष मुदतीचा पदवी
३. कला शिक्षक प्रशिक्षण (पदविका) - २ वर्षे
४. आर्ट मास्तर प्रमाणपत्र (सुट्टीतील अभ्यासक्रम) - ३ वर्ष
५. एम. एफ. अे. (रंगकला) - २ वर्षे
६. एम. एफ. अे. (उपयोजित कला) - २ वर्षे

४) शासकीय कला महाविद्यालय, औरंगाबाद

१. रंग व रेखाकला पदवी अभ्यासक्रम - ४ वर्ष
२. उपयोजित कला पदवी अभ्यासक्रम - ४ वर्ष
३. कला शिक्षक प्रशिक्षण - पदविका अभ्यासक्रम - २ वर्ष
४. टेक्सटाईल पदवी अभ्यासक्रम - ४ वर्ष
५. अप्रेटींस ट्रेनिंग कोर्स
६. एम. एफ. अे. (रंगकला) - २ वर्षे
७. एम. एफ. अे. (उपयोजित कला) - २ वर्षे

   a. छायाचित्रण प्रमाणपत्र १ वर्षे

b. जाळीमुद्रण (स्क्रिन प्रिंटींग प्रमाणपत्र १ वर्ष)

उपरोक्त ४ ही संस्थांतील पदवी अभ्यासक्रम प्रवेशासाठी सर्व प्रवेश गुणवत्तेनुसार देण्यात येतात. प्रवेश अर्ज संबंधित संस्थांमध्ये उपलब्ध करुन दिले जातात.

**प्रवेशाबाबतचे नियम :-** शासकीय कला संस्थांमध्ये पदवी अभ्यासक्रम सुरु झाल्याने प्रवेशाबातच्या नियमातही बदल झालेले आहेत. विद्यार्थी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण व ४५% पेक्षा कमी गुण नसावेत. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना कमीत कमी ४०% गुण मिळाले असल्यास प्रवेशासाठी अर्ज करु शकतात. त्यानंतर विद्यार्थ्यांची प्रवेश चाचणी घेऊन गुणवत्तेनुसार प्रवेश दिले जातात. उपरोक्त पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा त्यांच्या विद्यापिठांमार्फत घेतल्या जातात.

पदविका अभ्यासक्रम महाराष्ट्र शासनाची मुलभूत परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांस खालील अ. क्र. १ ते ७ समोरील पदविका अभ्यासक्रमास प्रवेश दिला जातो. इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड (इंटरमिजीएट ड्रॉईंग ग्रेट परीक्षा उत्तीर्ण नसलेल्या विदयार्थ्यांना इंटरमिजीएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या अटीच्या अधीन राहून सदरहू विद्यार्थ्यास प्रवेश देण्यात येतो परंतु त्या विद्यार्थ्यास त्या शैक्षणिक वर्षात इंटरमिजिएट ड्रॉईंग परीक्षा उत्तीर्ण होण अनिवार्य आहे.) परीक्षा दिली असता त्याच्या ग्रेड नुसार गुण ठरविण्यात आलेले आहे, ही अट लावण्यात आली आहे.

८. उच्चकला अभ्यासक्रमासाठी महाराष्ट्रात ३१ अनुदानित व १७२ विनाअनुदानित कला संस्थां आहेत. प्राचार्य, सोफिया पॉलिटेक्निक, मुंबई - २६ (मुलींसाठी)

सदर संस्थांमध्ये खालील पदविका अभ्यासक्रम राबविण्यात येतात.

| अ. क्र. | अभ्यासक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | रेखा व रंगकला | ४ वर्षे |
| २ | उपयोजित कला पदविका | ४ वर्षे |
| ३ | शिल्पकला | ४ वर्षे |
| ४ | अंतर्गत गृह सजावट | १ +२ वर्षे |
| ५ | मातकाम | १ +२ वर्षे |
| ६ | धातूकाम | १ +२ वर्षे |
| ७ | वस्त्रकाम | १ +२ वर्षे |
| ८ | मुलभूत | १ वर्षे |
| ९ | कला शिक्षक प्राशिक्षण | २ वर्षे |
| १० | कला शिक्षण शास्त्र | १ वर्षे |
| ११ | कला शिक्षक प्रमाणपत्र | १/३ वर्षे |

मूलभूत अभ्यासक्रमांना महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची इयत्ता १० वी उत्तीर्ण व इंटरमिजिएट ग्रेड ड्रॉईंग उत्तीर्ण ही शैक्षणिक अर्हता असून सर्व प्रवेश गुणवत्तेनुसार कला शिक्षक प्रशिक्षण पदविका अभ्यासक्रमासाठी महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची उच्च माध्यमिक (१२ वी ) उत्तीर्ण व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड (अनिवार्य नाही) ही परीक्षा उत्तीर्ण ही अर्हता निर्धारित करण्यात आली असून प्रवेश गुणवत्तेनुसार देण्यात येतात. कला शिक्षण शास्त्र पदविका अभ्यासक्रमास जी.डी.आर्ट उत्तीर्ण असणे आवश्यक असून कला शिक्षक प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी मान्यताप्राप्त शाळेत तीन वर्ष कला शिक्षक म्हणून शिकविण्याचा अनुभव आवश्यक आहे.

कला संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना भारत सरकारची मागासवर्गीय शिष्यवृत्ती दिली जाते. तसेच शासनाने मान्य केलेल्या सर्व सवलती दिल्या जातात. त्याचप्रमाणे शासकीय कला संस्थातून सामान्य शिष्यवृत्तीही दिल्या जातात. तसेच जे विद्यार्थी शेवटच्या वर्षाच्या परीक्षेत उत्तीर्ण होतात त्यांना शासकीय कला संस्थेत उपलब्ध जागेनुसार बोलावून फेलो म्हणून नेमण्यात येते. अशा फेलोंना प्रतिमहिना रु.५००/- विद्यावेतन दिले जाते.

**कला संस्थांना मान्यता :-** महाराष्ट्रातील कला संस्था सुरु करणाऱ्या नोंदणीकृत इच्छूक संस्थेने विहित नमुन्यातील आवेदनपत्र तीन प्रतीत संपूर्ण भरुन नोंदणी शुल्काच्या धनादेशासह निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयात ३१ डिसेंबर पर्यंत सादर करणे आवश्यक असते. विहित मुदतीनंतर रु.५००/- विलंब शुल्कासहित सदर अर्ज जानेवारी अखेरपर्यंत स्विकारण्यात

येतात. विहित नमुन्यातील आवेदनपत्र मागणी केल्यास दरवर्षी ऑक्टोंबर पासून निर्गमित करण्यात येतात. नोंदणी शुल्क खालीलप्रमाणे आकारण्यात येते. सद्यस्थितीत सदर प्रक्रीया संचालकांनी जाहीरात दिल्यानंतरच सुरु होते.

| | |
|---|---|
| १ वर्षाचा अभ्यासक्रम (विशिष्ट) | रु. ६०००/- |
| २ वर्षाचा विशिष्ट अभ्यासक्रम | रु.८०००/- |
| ४ वर्षाचा विशिष्ट अभ्यासक्रम | रु.१०,०००/- |
| डिप एड अभ्यासक्रम | रु.८०००/- |
| आर्ट मास्टर अभ्यासक्रम | रु.८०००/- |

**खालील अभ्यासक्रमांना त्यांच्यापुढे दर्शविल्याप्रमाणे मुदतठेव जमा करावी लागते.**

| | |
|---|---|
| १ वर्षाचा अभ्यासक्रम (विशिष्ट) | रु. १,००,०००/- |
| १ वर्षाचा विशिष्ट अभ्यासक्रम | रु. १,००,०००/- |
| २ वर्षाचा विशिष्ट अभ्यासक्रम | रु. २,००,०००/- |
| ४ वर्षाचा पदविका विशिष्ट अभ्यासक्रम | रु. ४,००,०००/- |

प्राप्त झालेले प्रस्ताव पडताळणीनंतर अभिप्रायासह कला संचालनालयामार्फत शासन मंजूरीसाठी शासनाला सादर करण्यात येतात व जनतेची गरज लक्षात घेऊन त्याला शासनाकडून विनाअनुदान तत्वावर मंजूरी देण्यात येते.

**अनुदान देण्याची पध्दत :-** ज्या कला संस्थांना पूर्वी अनुदानित कला संस्था म्हणून शासनाने मंजूरी दिली आहे त्यांना अनुज्ञेय खर्चाच्या ९० टक्के अथवा प्रत्यक्ष तूट यातील जे कमी असेल त्या दराने अनुदान मंजूर करण्यात येते. व हे अनुदान चार समान हप्त्यात देण्यात येते. त्यामध्ये वेतन व भत्ते आणि वेतनेत्तर खर्च यांचा समावेश असतो. वेतनेत्तर खर्चाच्या बाबीमध्ये इमारत भाडे, कार्यालयीन खर्च दूरध्वनी, विद्युतखर्च, शैक्षणिक खर्च, प्रवासभत्ता इत्यादी बाबींचा समावेश असतो.

**कलासंस्थांतील नियुक्त्या :-** कला संस्थातील नियुक्त्या अनुदान संहितेमध्ये निर्धारित करण्यात आलेल्या अर्हतेनुसार करण्यात येतात. शिक्षकीय पदांकरीता वर्तमानपत्रात रिक्त जागांबाबतची जाहिरात देऊन उमेद्वाराचे अर्ज मागविण्यात येतात व त्या उमेद्वारांच्या प्रात्यक्षिक व मुलाखती घेण्यात येतात व मुलाखत समितीवर कला संचालकांनी नेमून दिलेला कला संचालकांचा प्रतिनिधी असणे अनिवार्य असते.वर्ग तीन व चार या कर्मचाऱ्यांच्या नेमणुका सेवायोजना कार्यालय किंवा वर्तमानपत्रात जाहिरात देऊन मुलाखत घेऊन केल्या जातात.

सर्व शासनमान्य कला संस्थांत शासनाच्या धोरणाप्रमाणे आरक्षण पाळण्यात येते. व दरवर्षी महाविद्यालयास सुरु होण्यापूर्वी प्राचार्य विषय शिक्षकांच्या सहाय्याने अभ्यासक्रमाचे वार्षिक नियोजन करतात.

**रॅगिंग कायदा :-** बहुतांशी कला संस्थांमध्ये बसतीगृहाची सोय उपलब्ध नसल्यामुळे कला संस्थांत रॅगिंगची प्रकरणे घडत नाहीत. परंतु खबरदारीचा उपाय म्हणून सर्व संस्था प्रमुखांना रॅगिंग कायद्याबाबतची परीपत्रके निर्गमित करण्यात येतात व त्याचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत सूचना देण्यात येतात.

**देणग्या प्रतिबंधक नियम :-** शासनाच्या धोरणानुसार कला महाविद्यालयांना प्रवेशापोटी देणग्या घेण्यास सक्त मनाई आहे. व संस्थेत विद्यार्थ्यांकडून अथवा त्यांच्या पालकांकडून देणगी घेण्यात येत नसल्याचे फलक संस्थेच्या प्रवेशव्दारी लावण्याच्या सूचना सर्व संस्थांना देण्यात आल्या आहेत.

**वसातिगृह :-** कला संचालनालयाच्या अधिपत्याखलील कोणत्याही अनुदानित अथवा विनाअनुदानित संस्थेत हॉस्टेल नाही. फक्त शासकीय कला संस्थांसाठी कला नगर वांद्रे येथे सर ज. जी. कला संस्था वसतीगृह असून तेथे फक्त ज. जी. कला महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाच त्यांच्या गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येतो व हे सर्व प्रवेश शासनाने निर्धारीत केलेल्या नियमानुसार देण्यात येतात.

**शिक्षकांवर करावयाची कारवाई :-** कला संस्थांमधील शिक्षकांवर त्यांच्याबाबत काही तक्रारी आल्यास अनुदान संहितेतील नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येते. अभ्यासक्रमासंबंधीतल नियम व अटींची माहिति संस्थेच्या माहितीपत्रकात देण्यात येते. विद्यार्थी विभागाचे प्रदर्शन मुंबईबाहेर भरविण्यात येते. मुंबईबाहेर प्रदर्शन भरविण्यासाठी इच्छूक संस्थेने लिखित स्वरुपात कला संचालनालयाकडे मागणी करणे आवश्यक असते. व सदर मागणी त्यांनी प्रत्येक वर्षी साधारणपणे ऑगस्टपूर्वी करणे आवश्यक आहे.

आलेल्या मागण्या लक्षात घेऊन विद्यार्थी विभागच्या प्रदर्शनाची जागा निश्चित केली जाते. राज्य कला प्रदर्शनामध्ये रोख बक्षिसे देण्यात येऊन दरवर्षी एका जेष्ठ कलावंताचा सत्कार शासनातर्फे करण्यात येतो व त्याला राज्यपुरस्कार देण्यात येतो.

दुर्मिळ कलाकृती मिळवून त्याची जपणूक या संचालनालयामार्फत करण्यात येते. व प्रसंगी ती चित्रे विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनासाठी उपलब्ध करुन दिली जातात. विद्यार्थी व कलाकार यांना कला संचालनालयामार्फत सर ज. जी. कलादालन प्रदर्शनासाठी अल्प दरात उपलब्ध करुन देण्याची सोय उपलब्ध आहे. कला शिक्षणाची आखणी करुन राज्यकला सल्लागार मंडळाच्या शासनाचे प्रतिनिधी तसेच प्रतिथ यश कलाकार यांची निवड करण्यात येते व ही सल्लगार समित अभ्यासक्रम, परीक्षा पध्दती व सांस्कृतीक या बाबीवर आपला बहुमुल्य सल्ला देते.

कला शिक्षणाची अंमलबजावणी योग्य रितीने होते किंवा नाही याची शहानिशा करण्यासाठी या संचालनालयाच्या अंतर्गत निरीक्षक, चित्रकला व शिल्प यांचे कार्यालय कार्यरत असून संस्थांची शैक्षणिक तपासणी त्यांचे मार्फत करण्यात येते. तसेच तज्ञ कलाकारांच्या पथकामार्फत वार्षिक तपासणी करण्यात येते व निदर्शनास आलेल्या त्रुटींची पुर्तता करण्यात येते. कला संस्था, विद्यार्थी यांच्याकडून आलेल्या तक्रारीची नोंद घेऊन निरिक्षकांकडून चौकशी करण्यात येते व योग्य ती पुढील कार्यवाही वेळेत पूर्ण करण्यात येते.

विद्यार्थी प्रवेशासंबंधी जनतेला संबंधीत संस्थेचे प्राचार्य, योग्य ते मार्गदर्शन करतात व माहितीपत्रक उपलब करुन देतात. याबाबत काही तक्रार असल्यास कला संचालनालयाशी संपर्क साधल्यास त्वरीत तक्रार निवारण्याची सोय केली जाते.

नागरिकांच्या तक्रारी असल्यास त्यासाठी स्वतंत्र अधिकारी यांच्याकडे काम सोपविले आहे.

## बी. एफ. ए. प्रथम वर्ष सामायिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test)

शासकीय व अशासकीय विना अनुदानित कला संस्थेतील रेखा व रंगकला, उपयोजित कला, शिल्पकला, मातकाम, धातूकाम, अंतर्गत गृहसजावट, वस्त्रकाम इत्यादी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी राज्य पातळीवर कला संचालनालयामार्फत बी. एफ.ए. सामायिक प्रवेश परीक्षा घेण्यात येते. या प्रवेश परीक्षेसाठी वस्तूचित्र, संकल्पचित्र, स्मरणचित्र व सामान्यज्ञान या ४ विषयांसाठी २०० गुणांची प्रवेश परीक्षा घेण्यात येते.

| अ.क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| १ | वस्तूचित्र | ५० |
| २ | संकल्पचित्र | ५० |
| ३ | स्मरणचित्र | ५० |
| ४ | सामान्य ज्ञान | ४० |
| ५. | रेखा कला परिक्षा | १० |
| | एकूण | २०० |

*** महाराष्ट्रातील उमेद्‌वासाठी :** सदर इच्छूक उमेद्‌वाराने प्रवेशासाठी आपले अर्ज दिलेल्या तारखेच्या आत www.doa.org.in या संकेत स्थळावर ऑनलाईन भरुन स्वत: उमेद्‌वाराने ऑन लाईन भरलेल्या अर्जाची छापील प्रत घ्यावी, अे. आर. सी. केंद्रवर फॉर्म सादर करण्यात यावा.

*** महाराष्ट्राबाहेरील उमेद्‌वासाठी :** महाराष्ट्राबाहेरील उमेद्‌वाराने ऑन लाईन भरलेल्या अर्जाची छापील प्रत घ्यावी, ही पोच पावतीसाठी कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, कलाशाळा आवार, डॉ. दा. नौ. मार्ग, मुंबई ४०० ००१ या पत्यावर योग्य त्या रकमेच्या डि. डी. किंवा पी. ओ. सह सर्व प्रमाणपत्राच्या व दाखल्यांच्या सक्षम अधिकाऱ्यांनकडून साक्षांकित करुन घेतलेल्या प्रतींसह विहीत मुदतीत पोहचतील याप्रमाणे पाठवावे.

ऑन लाईन केलेले व पोच पावती दिलेले सर्व अर्ज पुढील प्रक्रीयेसाठी पात्र समजले जातील. उमेद्‌वाराने संकेत स्थळावरुन खालील प्रती मुद्रीत स्वरुपात प्राप्त करुन घ्याव्यात. उमेद्‌वारांची प्रत तपासणी अधिकाऱ्यांकडून स्वाक्षरी केलेली असावी.

सामाईक प्रवेश परीक्षा खालील केंद्रावर जून महिन्यामध्ये घेण्यात येते या बाबतची सविस्तर वेळापत्रक वर्तमानपत्रत प्रसिध्द करण्यात येते. खालील प्रमाणे सामायिक प्रवेश परीक्षा केंद्रे.

| अ.क्र. | परीक्षा केंद्रांची नावे |
|---|---|
| १ | सर ज.जी.कला महाविद्यालय, मुंबई |

| | |
|---|---|
| २ | सर ज.जी. उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई |
| ३ | शासकीय चित्रकला महाविद्यालय, नागपूर |
| ४ | शासकीय कला महाविद्यालय, औरंगाबाद |
| ५ | रचना संसद कॉलेज अप्लाईड आर्ट ॲन्ड क्राफ्ट, मुंबई |
| ६ | बी.एस. बांदेकर कॉलेज ऑफ फाईन आर्ट, सावंतवाडी |
| ७ | पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ अप्लाईड ॲन्ड क्रॉफट, पूणे |
| ८ | भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फाईन आर्ट, पुणे |
| ९ | सोफिया पॉलिटेक्निक कॉलेज, मुंबई |
| १० | विवा कॉलेज ऑफ अप्लाईड आर्ट, विरार |

*** पी. आय. ओ., परदेशी नागरीक व विद्यार्थ्यांसाठीची प्रक्रिया :-** जे. अण्ड के मायग्रंट, विस्थापित स्थलांतरीत पी. आय. ओ., परदेशी नागरिक व विद्यार्थी अर्जदारांनी आपला अर्ज कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई येथून घ्यावा. व योग्य ते कागदपत्रासहित अर्ज सादर करावा. विहित वेळेत अर्ज प्राप्त झालेल्या अर्जाची एकत्रित छानणी होऊन पात्र उमेद्वारांची विशेष प्रवेश प्रक्रीयेव्दारे (त्या संबंधीचा निकाल, निवड व जागा वाटप हे पूर्णत: विशेष सामायिक प्रवेश प्रक्रीयेच्या गुणांवर अवलंबून राहील) निवड केली जाईल.

बी.एफ.ए. सामाईक प्रवेश परीक्षा (CET) या पदाची सविस्तर माहिती कला संचालनालयाच्या www.doa.org.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

मा. मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण विभाग)

↓

मा. सचिव (उच्च व तंत्रशिक्षण विभाग)

↓

मा. उपसचिव

↓

मा. कला संचालक

↓

कला उप संचालक (प्रशा.)

निरीक्षक चित्रकला
व शिल्प, महाराष्ट्र राज्य
मुंबई

(सहाय्यक निरीक्षक, मुंबई.)

१. अधिष्ठाता, सर ज.जी.कला महाविद्यालय, मुंबई.
२. अधिष्ठाता, उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई.
३. अधिष्ठाता, शासकीय कला महाविद्यालय, औरंगाबाद
४. अधिष्ठाता, शासकीय चित्रकला महाविद्यालय, नागपूर

प्रबंधक (संस्थानिहाय प्रत्येकी १ एकूण ४)

सहायक निरीक्षक
विभागीय कार्यालय
औरंगाबाद

सहायक निरीक्षक
विभागीय कार्यालय
नागपूर

स्वीय
सहायक

परीक्षा
नियंत्रक
मुंबई

सहाय्यक निरीक्षक
कला संचालनालय

लेखा
अधिकारी

## कला संचालनालय व कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय कला संस्था / कार्यालय

| अ. क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरविण्याकरिता आवश्यक कागदपत्रे | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचे नांव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिका-यांचे नाव व हुद्दा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | राज्यातील विविध गावात, शहरात, सार्वजनिक ठिकाणी राष्ट्रपुरुष / थोर व्यक्ति यांचे पुतळे उभारताना पुतळ्याच्या क्ले मॉडेलला मान्यता देणे. | संबंधित संस्थेचा लेटरहेडवर प्रस्ताव (कोणातर्फे, कोणत्या ठिकाणी व कोणाचा पुतळा, कोणी तयार केला या बाबींचा उल्लेख असावा) | १. कला उपसंचालक (प्रशा.)<br>२. प्रमुख लिपिक | अर्ज केल्यानंतर १५ दिवसात तज्ञांची नेमणुक केली जाते. तज्ञांच्या अहवालानंतर १५ दिवसामध्ये मान्यता देण्यात येते. | कला संचालक |
| २. | कला संचालनालयामार्फत राबविण्यात येणारे पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी नोंदणीकृत संस्थांना शासन मान्यता देणे. | १) संस्थेचा लेटरहेडवर प्रस्ताव<br>२) संस्था नोंदणी प्रमाणपत्र<br>३) संस्थेचा ठराव<br>४) वित्तीय स्थैर्य दर्शविणारी कागदपत्रे<br>५) जागेसंबंधी कागदपत्रे<br>६) इमारतीचे फोटो व इतर | | संचालनालयामार्फत गठित समितीमार्फत नियोजित कला संस्थेची तपासणी करुन अहवाल १५ दिवसात संचालकांकडे पाठवितात व सर्व प्रस्ताव आल्यानंतर टास्क फोर्स समितीची बैठक १५ दिवसात घेतली जाते व संचालकांच्या शिफारशीसह प्रस्ताव शासनास १० दिवसात मान्यतेकरीता पाठविला जातो. | |
| ३. | दृककला क्षेत्रातील कलाकारांना कलाकार प्रमाणपत्र निर्गमित करणे. | १) अर्ज<br>२) शैक्षणिक कागदपत्रे<br>३) १५ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी या क्षेत्रात काम करीत असल्याचा पुरावा.<br>४) संबंधिताची उपजिविका या कलेवर अवलंबून आहे याचा पुरावा व इतर | | अर्ज केल्यानंतर १५ दिवसात तज्ञांची नेमणुक केली जाते व समितीच्या अहवालानंतर १५ दिवसात मान्यता देण्यात येते. | |
| ४. | अभ्यासक्रम पुर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना नोकरीच्या उद्देशाने समकक्ष प्रमाणपत्र व पुढील शिक्षणासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणे. | १) अर्ज<br>२) शैक्षणिक कागदपत्रे | | अर्ज केल्यानंतर १ महिन्याच्या आत | |
| ५. | कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील कला महाविद्यालयांचे व्यवस्थापन हस्तांतरण व महाविद्यालय स्थलांतरण करण्यास मान्यता देण्याबाबतची कार्यवाही करणे | १) दोन्ही संस्थांचा लेटरहेडवर प्रस्ताव<br>२) संस्था नोंदणी प्रमाणपत्र<br>३) दोन्ही संस्थांचे ठराव<br>४) वित्तीय स्थैर्य दर्शविणारी कागदपत्रे<br>५) जागेसंबंधी कागदपत्रे<br>६) इमारतीचे फोटो व इतर<br>७) दोन्ही संस्थांचा रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा | | निरीक्षकांच्या अहवालानंतर ४५ दिवस | |

| अ. क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरविण्याकरिता आवश्यक कागदपत्रे | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचे नांव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिका-यांचे नाव व हुद्दा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ६. | विनाअनुदानित कला महाविद्यालयांना अनुदान मिळणेबाबतचे प्रस्ताव शासनास सादर करणेबाबतच्या कार्यवाहीची नस्ती. | १) संस्थेच्या लेटरहेडवर प्रस्ताव<br>२) संस्था नोंदणी प्रमाणपत्र<br>३) संस्थेचा ठराव<br>४) वित्तीय स्थैर्य दर्शविणारी कागदपत्रे<br>५) जागेसंबंधी कागदपत्रे<br>६) इमारतीचे फोटो व इतर<br>७) अभ्यासक्रम मान्यता पत्र<br>८) मागील पांच वर्षाची विद्यार्थी संख्या | | शासन स्तरावरील बाब | |
| ७. | कला महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी राज्यातील एका जिल्हयात तसेच व्यावसायिक कलाकारांसाठी स्वतंत्र राज्य कला प्रदर्शन भरविणे, प्रोत्साहन देणे. नामवंत ज्येष्ठ कलाकारास राज्यकला पुरस्कार तसेच विद्यार्थी विभागातील गुणवत्ता बक्षीस पात्र उमेदवारांना प्रमाणपत्र देणे. कला संचालनालयाच्या आस्थापना शाखेशी संबंधित दैनंदिन सर्व कामे. | अधिवास प्रमाणपत्र | संचालकाच्या अध्यक्षतेखाली राज्य कला प्रदर्शन समिती सदस्य सचिव स्वीय सहा. | राज्यकला प्रदर्शन समितीने ठरवून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे | कला उपसंचालक (प्रशा.) / कला संचालक |
| ८. | शासकीय रेखाकला (Elementary & Intermediate Drawing Grade) व उच्चकला परीक्षा आयोजन करुन निकाल जाहीर करणे तसेच परीक्षा केंद्र खर्च व मानधन देयके तयार करणे. | परीक्षा केंद्रामार्फत प्राप्त झालेल्या अभिलेखानुसार | टिप्पणी सहाय्यक | देयक प्राप्त झाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार ६ महिन्यात | परीक्षा नियंत्रक |
| ९ | साहित्य खरेदी | दरपत्रके | परीक्षा नियंत्रक | नियोजनाप्रमाणे | कला उपसंचालक (प्रशा.)/कला संचालक |

## कला संचालनालय व कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील अधिकाऱ्यांचे पदनाम व दूरध्वनी क्रमांक

### कला संचालनालय :-

| अ.क्र. | अधिका-याचे पदनाम | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १ | कला संचालक | ०२२-२२६२१२२५ |
| २ | कला उपसंचालक (प्रशासकीय) | ०२२-२२६२०२३१/३२ |
| ३ | स्वीय सहाय्यक | कित्ता |
| ४ | परीक्षा नियंत्रक | कित्ता |
| ५ | सहाय्यक निरीक्षक | कित्ता |
| ६ | लेखा अधिकारी | कित्ता |

### निरीक्षक, चित्रकला व शिल्प, मुंबई :-

| अ.क्र. | अधिका-याचे पदनाम | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १ | निरीक्षक, चित्रकला व शिल्प, मुंबई. | ०२२-२२६२०३०४ |
| २ | सहाय्यक निरीक्षक, चित्रकला व शिल्प, मुंबई. | ०२२-२२६२०३०४ |

### सहाय्यक निरीक्षक, विभागीय कार्यालय, नागपूर :-

| अ.क्र. | अधिका-याचे पदनाम | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १ | सहाय्यक निरीक्षक, विभागीय कार्यालय, नागपूर | ०७१२-२२२४६८० |

### अधिष्ठाता, सर ज.जी.कला महाविद्यालय, मुंबई :-

| अ.क्र. | अधिका-याचे पदनाम | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १ | अधिष्ठाता, सर ज.जी.कला महाविद्यालय, मुंबई | ०२२-२२६२१६५२ |
| २ | प्रबंधक, सर ज.जी.कला महाविद्यालय, मुंबई | कित्ता |

अधिष्ठाता, सर ज.जी.उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई :-

| अ.क्र. | अधिका-याचे पदनाम | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १ | अधिष्ठाता, सर ज.जी.उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई | ०२२-२२६२०५८६ |
| २ | प्रबंधक, सर ज.जी.उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई | ०२२-२२६२१२७६/७७ |

अधिष्ठाता, शासकीय चित्रकला महाविद्यालय, नागपूर :-

| अ.क्र. | अधिका-याचे पदनाम | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १ | अधिष्ठाता, शासकीय चित्रकला महाविद्यालय, नागपूर | ०७१२-२२२४६८० |
| २ | प्रबंधक, शासकीय चित्रकला महाविद्यालय, नागपूर | कित्ता |

अधिष्ठाता, शासकीय कला महाविद्यालय, औरंगाबाद :-

| अ.क्र. | अधिका-याचे पदनाम | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १ | अधिष्ठाता, शासकीय कला महाविद्यालय, औरंगाबाद | ०२४०-२४०२५२५ |
| २ | प्रबंधक, शासकीय कला महाविद्यालय, औरंगाबाद | कित्ता |